दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ | वर्ष - १ | अंक - ३०३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

दिनांक : ३१ जुलै २०२६ वार : शुक्रवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : द्वितीया तिथी (रात्री १०:३१ पर्यंत) त्यानंतर तृतीया तिथी नक्षत्र : धनिष्ठा नक्षत्र (रात्री ०७:२६ पर्यंत) त्यानंतर शततारका नक्षत्र योग : सौभाग्य योग (रात्री ११:५३ पर्यंत) त्यानंतर शोभन योग करण : तैतुला करण (सकाळी १०:०४ पर्यंत)

### जमिनीची परस्पर विक्री करुन उद्योगपतीची साडेपाच कोटींची फसवणूक

**पुणे :** न्यायालयात दावा चालू असताना लोहगाव येथील एक हेक्टरपैकी ४८ आर जमिनीची कोणतीही संमती न घेता परस्पर विक्री करून ५ कोटी ७० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी लोहगाव पोलिसांनी ५ जणांना अटक केली आहे. याबाबत रवींद्र नौपातलाल साकला (वय ६३, रा. आर. एन. एस. ॲलेक्झांड्रा रोड, घोरपडी) यांनी लोहगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी सुभाष उत्तमचंद दुगड, राजेंद्र उत्तमचंद दुगड (रा. बिबवेवाडी), संदेश अशोक भन्साळी (रा. खेड), शेख उमर लतीफ इनामदार, मेहबूब अब्दुल गफार शेख, भास्कर रेड्डी नारायण कल्लरी रेड्डी (रा. वडगाव शेरी) अशा ६ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## सारांश वृत्त

### शिवसेना सत्तेत असतानाही पुणे महापालिकेसमोर आंदोलन; धंगेकरांची स्पष्ट भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगर पालिकेसमोर शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी विविध प्रलंबित नागरी प्रश्नांवर आंदोलन केले. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते भगवे झेंडे घेऊन महापालिका परिसरात जमले होते. आंदोलनादरम्यान घोषणाबाजी करण्यात आली आणि प्रशासनाचे लक्ष नागरिकांच्या समस्यांकडे वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या आंदोलनानंतर माध्यमांशी संवाद साधताना माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी शिवसेना सत्तेत सहभागी असतानाही आंदोलन करण्याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. नागरिकांच्या प्रश्नांसाठी कोणत्याही पक्षाने आवाज उठवणे चुकीचे नसल्याचे त्यांनी सांगितल्याचे व्हिडिओमध्ये दिसते. दरम्यान, आंदोलनाचे नेमके कारण आणि धंगेकरांच्या संपूर्ण वक्तव्याचा तपशील संबंधित व्हिडिओ किंवा अधिकृत निवेदनानंतर स्पष्ट होणार आहे.

### दिल्लीत महासत्तांचा मेळावा! शी जिनपिंग आणि व्लादिमीर पुतिन भारत दौऱ्याच्या तयारीत; ब्रिक्स परिषदेत मोदींसोबत निर्णायक बैठक?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

सप्टेंबरमध्ये नवी दिल्ली येथे होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर भारताने उच्चस्तरीय राजनैतिक आणि सुरक्षा तयारीला वेग दिला आहे. या परिषदेला चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन उपस्थित राहण्याची शक्यता असल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर या बैठकीकडे विशेष लक्ष लागले आहे.

१२ आणि १३ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी, शी जिनपिंग आणि व्लादिमीर पुतिन यांच्यात महत्त्वपूर्ण चर्चा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या भेटींसंदर्भातील सल्लामसलत आणि नियोजन प्रक्रिया सध्या सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. दरम्यान, भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी नुकतीच बीजिंगमध्ये चीनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी व्यापक चर्चा केली. या चर्चेत द्विपक्षीय संबंध, उच्चस्तरीय भेटी आणि राजनैतिक संवाद अधिक बळकट करण्यावर भर देण्यात आल्याचे समोर आले आहे.

# ‘पंतप्रधानांच्या निर्णयावर प्रश्नच विचारायचे नाहीत?

## सर्वोच्च न्यायालयात केंद्राचा सवाल; मग शिक्षणमंत्र्यांच्या नियुक्तीपासून निवडणूक आयुक्तांपर्यंत उत्तरदायित्व कोणाचे?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी**

मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) आणि इतर निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेवरून सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीत गुरुवारी (३० जुलै २०२६) केंद्र सरकारने महत्त्वाची भूमिका मांडली. जर पंतप्रधानांच्या निर्णयावर विश्वास ठेवता येत नसेल, तर मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या नियुक्तीवेळीही एखादा माजी न्यायाधीश सल्ला देण्यासाठी बसवावा लागेल का? असा प्रश्न केंद्राने न्यायालयासमोर उपस्थित केला.

यावर सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, हा मुद्दा पंतप्रधानांवरील विश्वास किंवा अविश्वासाचा नसून, न्याय, निष्पक्षता आणि नियुक्ती प्रक्रिया पारदर्शक दिसणे यांचा आहे. न्यायालयाने अधोरेखित केले की, लोकशाही संस्थांवरील जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी प्रक्रिया केवळ निष्पक्ष असणे पुरेसे नाही, तर ती निष्पक्ष असल्याचे दिसणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

ही सुनावणी मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त (नियुक्ती, सेवा अटी आणि कार्यकाळ) अधिनियम, २०२३ ला आव्हान देणाऱ्या याचिकांवर



सुरू आहे. या कायद्यानुसार निवड समितीत पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि केंद्रीय मंत्रिमंडळातील एक मंत्री यांचा समावेश आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम व्यवस्थेत भारताचे सरन्यायाधीशही या समितीचा भाग होते.

दरम्यान, विरोधक सरकारच्या अलीकडील काही नियुक्त्यांवर आधीच प्रश्न उपस्थित करत आहेत. शिक्षण क्षेत्रातील वाद, माजी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर झालेली नवीन नियुक्ती, तसेच विविध स्वायत्त संस्थांच्या नेतृत्वाबाबत राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत.

दुसरीकडे, सरकारचा दावा आहे की सर्व नियुक्त्या कायदेशीर प्रक्रियेनुसार आणि घटनात्मक चौकटीतच करण्यात आल्या आहेत.

सर्वोच्च न्यायालयातील ही सुनावणी केवळ एका नियुक्तीपुरती मर्यादित नसून, देशातील घटनात्मक संस्थांच्या स्वायत्ततेचा, नियुक्ती प्रक्रियेतील पारदर्शकतेचा आणि सत्तेवरील संस्थात्मक नियंत्रणाचा व्यापक प्रश्न उपस्थित करत असल्याचे मानले जात आहे. अंतिम निर्णयाचा परिणाम भविष्यातील निवडणूक आयोगाच्या रचनेवर आणि अशा घटनात्मक नियुक्त्यांच्या प्रक्रियेवर दूरगामी परिणाम करू शकतो.

## राम मंदिर की संघ परिवाराचा विस्तार? ट्रस्टच्या सचिवपदी संघाशी संबंधित व्यक्ती; श्रद्धा, व्यवस्थापन आणि राजकारणाच्या सीमारेषा पुन्हा चर्चेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अयोध्या । वृत्तसंस्था**

अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने मंदिराच्या दैनंदिन प्रशासनासाठी जगदीश आफळे यांची सचिवपदी नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. २ सप्टेंबर २०२६ रोजी ट्रस्टच्या कार्यकारिणी बैठकीत या नियुक्तीला औपचारिक मंजुरी दिली जाणार आहे. मात्र, या निर्णयाने केवळ प्रशासकीय नव्हे तर राजकीय चर्चेलाही नवे वळण मिळण्याची चिन्हे आहेत.

पुण्याचे रहिवासी आणि आयआयटी मुंबईचे बी.टेक. व एम.टेक. पदवीधर असलेले आफळे यांचा बहुराष्ट्रीय कंपन्यांतील अनुभव उल्लेखनीय मानला जात असला, तरी ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित असल्याची बाब चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. त्यामुळे प्रश्न उपस्थित होत आहेदेशातील सर्वात महत्त्वाच्या धार्मिक संस्थांच्या नेतृत्वात संघाशी संबंधित व्यक्तींचे वर्चस्व हा केवळ योगायोग आहे, की व्यापक वैचारिक प्रभावाचे प्रतिबिंब?

ही नियुक्ती अशा वेळी होत आहे, जेव्हा राम मंदिर ट्रस्ट जून २०२६ मध्ये समोर आलेल्या देणग्यांच्या कथित गैरव्यवहाराच्या आरोपांमुळे आधीच चर्चेत आहे. अशा परिस्थितीत प्रशासनातील बदल हा केवळ व्यवस्थापनाचा निर्णय आहे की संस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याचा प्रयत्न, यावरही चर्चा सुरू झाली आहे.

समर्थकांचे म्हणणे आहे की, आफळे यांची शैक्षणिक पात्रता आणि प्रशासकीय अनुभव त्यांना या पदासाठी सक्षम ठरवतात. तर टीकाकारांचा प्रश्न वेगळाच आहेधार्मिक संस्थांमधील महत्त्वाच्या नियुक्त्यांमध्ये विशिष्ट वैचारिक पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींनाच सातत्याने प्राधान्य मिळत असल्याची प्रतिमा निर्माण होत नाही का?

राम मंदिराच्या उभारणीचे राजकीय श्रेय, त्यावरील सार्वजनिक भावना आणि आता ट्रस्टमधील नियुक्त्या या सर्वांमुळे पुन्हा एकदा एक मूलभूत प्रश्न समोर येत आहेधार्मिक श्रद्धा आणि संस्थात्मक स्वायत्तता यांच्यात स्पष्ट सीमारेषा राहिली आहे का, की त्या अधिकाधिक राजकीय चर्चेचा भाग बनत आहेत?

## विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर न्याय्य निर्णय होणार : राज्यमंत्री आशिष जयस्वाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । विशेष प्रतिनिधी**

वित्त व लेखा सेवेतील भरतीसंदर्भात विद्यार्थ्यांनी मांडलेल्या मागण्या, सूचना आणि आक्षेपांचा सर्वंकष व वस्तुनिष्ठ विचार करून न्याय्य निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही वित्त, नियोजन, कृषी मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी दिली. त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत पारदर्शक, गुणवत्ताधारित आणि सर्वसमावेशक निर्णय प्रक्रियेवर भर देण्यात आला.

बैठकीत विद्यार्थी प्रतिनिधींनी वित्त व लेखा सेवेतील भरतीसाठी वाणिज्य शाखेच्या पात्रतेबाबत विविध मुद्दे मांडले. सेवाप्रवेश नियमांतील बदल, समितीची रचना, इतर राज्यांतील निकष, विभागातील कामाचे स्वरूप, संवर्ग रचना, गुणवत्तेचे निकष, रिक्त पदे, प्रशिक्षण तसेच वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध संधी यावर सविस्तर चर्चा झाली. राज्यमंत्री जयस्वाल यांनी संबंधित समितीला प्रत्येक मुद्द्याचा सखोल अभ्यास करून कारणमीमांसेसह वस्तुनिष्ठ अभिप्राय नोंदवत सुधारित अहवाल शासनाकडे सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच वित्त व लेखा सेवेतील काही पदांसाठी वाणिज्य शाखेच्या उमेदवारांना अधिक संधी उपलब्ध करून देण्याबाबत व्यवहार्य पर्यायांचा अभ्यास करून लेखा व कोषागार संचालनालयाने सविस्तर अहवाल सादर करावा, असेही त्यांनी सांगितले. या बैठकीस विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे, लेखा व कोषागार संचालिका दीपा देशपांडे, उपसचिव विनायक धोत्रे, स्थानिक निधी व लेखापरीक्षा संचालनालयाचे संचालक निलेश राजूरकर तसेच विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.

## धनुष्यबाणाचा निर्णय घाईत झाला? सर्वोच्च न्यायालयात ठाकरे गटाचा थेट सवाल; ‘बंडखोरांनाच मूळ पक्ष कसा?’

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष वृत्त**

शिवसेना पक्षाचे नाव, ‘धनुष्यबाण’ हे निवडणूक चिन्ह आणि आमदारांच्या अपात्रतेसंदर्भातील बहुचर्चित प्रकरणात गुरुवारी (३० जुलै २०२६) सर्वोच्च न्यायालयात महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी सविस्तर युक्तिवाद करत निवडणूक आयोगाच्या निर्णयावर गंभीर प्रश्न उपस्थित केले. न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी ४ ऑगस्ट २०२६ रोजी निश्चित केली आहे.

युक्तिवादादरम्यान सिब्बल यांनी सांगितले की, १९६६ मध्ये बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली, २०१३ मध्ये उद्धव ठाकरे पक्षप्रमुख झाले आणि २०१८ मधील पक्षांतर्गत निवडणुका तसेच पक्षघटनेतील दुरुस्त्या नियमानुसार झाल्या होत्या. त्या संदर्भातील कागदपत्रेही न्यायालयात सादर करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. सिब्बल यांनी न्यायालयाला सांगितले की, २०१८ मध्ये एकनाथ शिंदे यांची गटनेते म्हणून नियुक्ती स्वतः उद्धव ठाकरे यांनीच केली होती. त्यानंतर जून २०२२ मध्ये विधान परिषद निवडणुकीतील कथित क्रॉस व्होटिंगनंतर ३१ आमदार सुरतला गेले आणि नंतर गुवाहाटीत त्यांची संख्या ३९ झाली. या आमदारांनी पक्षाच्या प्रतोदाला हटवून पुढील राजकीय घडामोडींना सुरुवात केली, असे त्यांनी मांडले. ठाकरे गटाच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, एका पक्षाच्या चिन्हावर निवडून येऊन नंतर बंड करून त्याच पक्षावर दावा सांगणे हे प्रतिनिधिक लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत आहे. तसेच ‘सुभाष देसाई’ प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला देत राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष हे स्वतंत्र घटक असल्याचेही त्यांनी नमूद केले. सिब्बल यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयावरही प्रश्न उपस्थित करत दावा केला की, २०१८ मधील सुधारित पक्षघटनेचा विचार न करता केवळ आमदारांच्या संख्याबळाच्या आधारावर शिंदे गटाला ‘शिवसेना’ हे नाव आणि ‘धनुष्यबाण’ चिन्ह देण्यात आले.

## आधी लाठी, आता माफी? आंदोलकांवरील गुन्हे मागे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष वृत्त**

पेपरफुटी प्रकरणाविरोधात रस्त्यावर उतरलेल्या हजारो विद्यार्थी आणि आंदोलकांवर कठोर कारवाई करणाऱ्या दिल्ली सरकारने आता त्याच आंदोलनातील बहुतांश सहभागींचे गुन्हे मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहेसरकारने अखेर आपली आक्रमक भूमिका मवाळ केली का, की सुरुवातीची कठोर कारवाईच अनावश्यक होती?

२० जुलै रोजी ‘चलो संसद’ मोर्चादरम्यान झालेल्या हिंसाचारानंतर दिल्ली पोलिसांनी १३ गुन्हे दाखल केले होते. सीसीटीव्हीच्या आधारे २,८७३ जणांची ओळख पटवण्यात आली. त्यानंतर मोठ्या प्रमाणावर अटक, चौकशी आणि गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली. मात्र आता उपराज्यपालांच्या मंजुरीनंतर दिल्ली सरकारने स्पष्ट केले आहे की, ज्यांच्यावर यापूर्वी गंभीर गुन्हे नाहीत अशा विद्यार्थी आणि सामान्य आंदोलकांवरील खटले मागे घेतले जातील.

सरकारने मात्र गंभीर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना या निर्णयातून वगळले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ओळख पटलेल्या २,८७३ जणांपैकी ९८९ जणांवर हत्या, दरोडा, लैंगिक अत्याचार, अपहरण आणि अमली पदार्थांशी संबंधित गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. त्यांच्यावरील कारवाई कायम राहणार आहे.

पेपरफुटीनंतर देशभरात विद्यार्थ्यांचा तीव्र संताप उसळला होता. शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता, जबाबदारी आणि सुधारणांच्या मागणीसाठी झालेल्या आंदोलनानंतर केंद्र सरकारला चर्चेचा मार्ग स्वीकारावा लागला. त्यानंतर तत्कालीन शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा आणि सुधारणा समितीची घोषणा करण्यात आली.

## भोजशाळा वादात सर्वोच्च न्यायालयाचा मोठा हस्तक्षेप! नमाजासाठी स्वतंत्र जागेचा विचार करा; ‘धार्मिक स्वातंत्र्याची हमी देणे हे राज्याचे घटनात्मक कर्तव्य’ : सर्वोच्च न्यायालय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

नवी दिल्ली । ३० जुलै २०२६

मध्य प्रदेशातील दीर्घकाळापासून वादाच्या केंद्रस्थानी असलेल्या भोजशाळा–कमाल मौला मशीद संकुल प्रकरणात ३० जुलै २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत राज्य सरकारला मोठा निर्देश दिला आहे. न्यायालयाने मध्य प्रदेश प्रशासनाला मुस्लिम पक्षकारांशी चर्चा करून वादग्रस्त संकुलालगत असलेल्या दर्ग्याजवळ नमाज अदा करण्यासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याच्या शक्यतेचा गांभीर्याने विचार करण्यास सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे राज्याचे कर्तव्य असले तरी, त्याचबरोबर प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्मानुसार धार्मिक विधी पार पाडण्याचे स्वातंत्र्य मिळेल याची खात्री करणे हीदेखील राज्याची घटनात्मक जबाबदारी आहे. त्यामुळे प्रशासनाने केवळ सुरक्षा व्यवस्थेपुरते मर्यादित न राहता सर्व समुदायांच्या धार्मिक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

भोजशाळा–कमाल मौला संकुल हे अनेक वर्षांपासून हिंदू आणि मुस्लिम समाजातील धार्मिक दाव्यांमुळे वादाच्या केंद्रस्थानी आहे. हिंदू समाज या ठिकाणाला माता वाग्देवीचे प्राचीन मंदिर मानतो, तर मुस्लिम समाजाच्या मते येथे कमाल मौला मशीद असून धार्मिक परंपरेनुसार नमाज अदा केली जाते. या पार्श्वभूमीवर अनेक वर्षांपासून न्यायालयीन लढाई सुरू असून, प्रशासनालाही वारंवार सुरक्षा व्यवस्था आणि धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन करावे लागत आहे.

या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने कोणताही अंतिम निकाल दिलेला नसला तरी, शुक्रवारी नमाजासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देता येईल का, याबाबत मध्य प्रदेश सरकारने मुस्लिम पक्षकारांशी समन्वय साधावा, असा निर्देश दिला. यामुळे तणाव कमी करण्याचा आणि दोन्ही समुदायांच्या धार्मिक भावना जपण्याचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न न्यायालयाने केल्याचे मानले जात आहे.

न्यायालयाच्या निरीक्षणात भारतीय राज्यघटनेतील धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकाराला विशेष महत्त्व देण्यात आले. न्यायालयाने सूचित केले की, प्रशासनाने कोणत्याही एका समुदायाच्या धार्मिक अधिकारांकडे दुर्लक्ष न करता सर्वांना समान वागणूक देणे आवश्यक आहे. हेच भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

दरम्यान, या प्रकरणाकडे देशभराचे लक्ष लागले असून, पुढील सुनावण्यांमध्ये मध्य प्रदेश सरकारची भूमिका, पर्यायी जागेबाबतचा निर्णय आणि वादग्रस्त संकुलाच्या व्यवस्थापनासंदर्भातील पुढील न्यायालयीन निर्देश महत्त्वाचे ठरणार आहेत. धार्मिक संवेदनशीलतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा संवाद, घटनात्मक मूल्ये आणि सर्व समुदायांच्या धार्मिक अधिकारांच्या संरक्षणावर भर दिल्याचे दिसून येत आहे.

## संपादकीय

### सर्टिफिकेट मंजूर पण प्रकल्प अर्धवट! हजारो कोटी खर्च करूनही सरकार विकास पूर्ण का करू शकत नाही?

नमस्कार! तुम्ही पाहत आहात राज्य लोकतंत्र. आज आपण अशा एका निर्णयाबद्दल बोलणार आहोत, जो केवळ पर्यावरणाशी संबंधित नाही, तर भारतातील विकासाच्या मॉडेलवरच गंभीर प्रश्न उपस्थित करतो. सरकार म्हणते देशात विकास वेगाने सुरू आहे, पण सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, नियम मोडून विकास करता येत नाही. मग प्रश्न असा निर्माण होतो की, जर प्रकल्पांना पर्यावरणीय मंजुरी आधीच घ्यायची असते, तर अनेक प्रकल्प मंजुरीशिवाय सुरू कसे होतात? आणि जेव्हा न्यायालय अशा प्रकल्पांवर प्रश्न उपस्थित करते, तेव्हा हजारो कोटी रुपयांचा सार्वजनिक पैसा धोक्यात का येतो? आज आपण सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयाचा अर्थ समजून घेणार आहोत आणि त्याचबरोबर भारतातील अशा मोठ्या प्रकल्पांचा आढावा घेणार आहोत, ज्यांच्यावर प्रचंड खर्च झाला, पण ते आजही पूर्णत्वास पोहोचलेले नाहीत.

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारचे २०२१ चे कार्यालयीन पत्रक (जषषळलश चशोॲरपर्वी) रद्द केले आहे. या पत्रकामुळे आधी काम सुरू करून नंतर पूर्वलक्षी प्रभावाने पर्यावरणीय मंजुरी घेण्याचा मार्ग खुला झाला होता. न्यायालयाने हा मार्ग बेकायदेशीर ठरवत स्पष्ट केले की पर्यावरण संरक्षण कायदा हा केवळ औपचारिकता नसून विकास प्रक्रियेचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. न्यायालयाच्या मते, नियमांचे उल्लंघन करून प्रकल्प सुरू करणे आणि नंतर मंजुरी घेणे म्हणजे कायद्यालाच बगल देणे होय. हा निर्णय केवळ पर्यावरणाच्या संरक्षणासाठी नाही, तर प्रशासनाच्या नियोजनक्षमतेवरही गंभीर प्रश्न उपस्थित करतो.

याच ठिकाणी एक मोठा प्रश्न निर्माण होतो. जर सरकारकडे तज्ज्ञ, अधिकारी, मंत्रालये आणि नियोजनासाठी स्वतंत्र यंत्रणा आहे, तर आवश्यक मंजुरी न घेता प्रकल्प सुरूच कसे होतात? आणि जर नंतर न्यायालयाने अशा प्रकल्पांवर आक्षेप घेतला, तर विलंबामुळे वाढलेला खर्च, नुकसान आणि सार्वजनिक पैशाची जबाबदारी कोण स्वीकारणार? भारतात आज अनेक प्रकल्प असे आहेत ज्यांची घोषणा मोठ्या उत्साहात झाली, भूमिपूजन झाले, निधी मंजूर झाला, पण प्रत्यक्षात ते अनेक वर्षांपासून अपूर्ण आहेत. यातील सर्वात मोठे उदाहरण म्हणजे मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प. देशातील हा सर्वात महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्प मानला जातो. सुरुवातीला त्याची किंमत सुमारे १.०८ लाख कोटी रुपये इतकी निश्चित करण्यात आली होती. मात्र जमीन संपादन, पर्यावरणीय मंजुरी, न्यायालयीन प्रक्रिया आणि प्रशासकीय विलंब यामुळे प्रकल्पाची मूळ अंतिम मुदत ओलांडली गेली. हजारो कोटी रुपयांचा निधी खर्च झाला असूनही संपूर्ण मार्ग अद्याप कार्यान्वित झालेला नाही. यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, जर नियोजन सुरुवातीपासूनच सर्व बाबी लक्षात घेऊन झाले असते, तर इतका मोठा विलंब टाळता आला नसता का? दुसरे उदाहरण म्हणजे आंध्र प्रदेशातील पोलावरम सिंचन प्रकल्प. हा राष्ट्रीय महत्त्वाचा प्रकल्प असून सुरुवातीचा खर्च काही हजार कोटी रुपयांमध्ये अपेक्षित होता. मात्र वर्षानुवर्षे खर्च वाढत गेला आणि सुधारित अंदाज ५५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक झाला. पुनर्वसन, पर्यावरणीय मंजुरी आणि प्रशासकीय अडचणींमुळे प्रकल्प अजूनही पूर्ण झालेला नाही. दरम्यान निधी वाढत राहिला, पण अपेक्षित लाभ मात्र नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचला नाही. याचप्रमाणे केन–बेतवा नदीजोड प्रकल्प हा भारतातील महत्त्वाकांक्षी जलसंपदा प्रकल्प मानला जातो. या प्रकल्पाची किंमत ४४ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. मात्र जंगल क्षेत्र, वन्यजीव संरक्षण, पर्यावरणीय मंजुरी आणि विविध कायदेशीर प्रक्रियांमुळे अनेक वर्षे फाईली मंत्रालयांमध्येच अडकून राहिल्या. परिणामी प्रकल्पाची गती मंदावली आणि खर्च वाढत गेला. सरकारने देशभरातील शंभर शहरांसाठी स्मार्ट सिटी मिशन सुरू केले. हजारो कोटी रुपयांचा निधी या योजनेसाठी मंजूर करण्यात आला. अनेक शहरांमध्ये रस्ते खोदले गेले, डिजिटल सुविधा उभारण्याची घोषणा झाली, स्मार्ट ट्रॅफिक सिस्टीम, ड्रेनेज आणि सार्वजनिक सुविधा विकसित करण्याचे आश्वासन देण्यात आले. पण अनेक शहरांमध्ये आजही अपूर्ण रस्ते, बंद पडलेले डिजिटल प्रकल्प, अपूर्ण ड्रेनेज आणि नागरिकांना अपेक्षित सुविधा न मिळाल्याच्या तक्रारी कायम आहेत. यामुळे केवळ खर्च वाढला नाही, तर नागरिकांचाही विकासावरील विश्वास कमी झाला.

अशीच परिस्थिती नमामी गंगे योजनेबाबतही पाहायला मिळते. गंगा नदी स्वच्छ करण्यासाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. अनेक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. काही ठिकाणी प्रगती झाली असली तरी अनेक प्रकल्प वेळेत पूर्ण झाले नाहीत. परिणामी अनेक भागांमध्ये नदी प्रदूषणाचा प्रश्न आजही कायम आहे. पैसा खर्च झाला, योजना जाहीर झाल्या, पण अपेक्षित परिणाम अनेक ठिकाणी अजूनही दिसत नाहीत.

या सर्व बाबींवर भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक, म्हणजेच उअॠ वारंवार निरीक्षण नोंदवत आले आहेत. त्यांच्या अहवालांमध्ये चुकीचे नियोजन, खर्चात सातत्याने वाढ, वेळेत काम पूर्ण न होणे, मंजुरी प्रक्रियेतील विलंब आणि जमीन संपादनातील अडथळे ही कारणे पुन्हा पुन्हा अधोरेखित करण्यात आली आहेत. यामुळे सार्वजनिक पैशाचा कार्यक्षम वापर होत नसल्याचेही अनेक अहवालांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

अनेकदा सरकारकडून असा युक्तिवाद केला जातो की पर्यावरणीय मंजुरीमुळे विकासाचा वेग कमी होतो. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयातून वेगळाच संदेश समोर येतो. न्यायालय म्हणते, समस्या पर्यावरणीय मंजुरीची नाही, तर नियमांचे पालन न करता प्रकल्प सुरू करण्याच्या पद्धतीची आहे. जर सुरुवातीलाच पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास, सामाजिक परिणामांचे मूल्यांकन, पुनर्वसनाची तयारी, आवश्यक निधी आणि जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली, तर प्रकल्प अर्धवट राहण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या प्रत्येक अर्धवट प्रकल्पामागे करदात्यांचा पैसा असतो. एखादा पूल असो, महामार्ग असो, सिंचन योजना असो किंवा रेल्वे प्रकल्प ˙ प्रत्येक ठिकाणी हजारो कोटी रुपयांची सार्वजनिक गुंतवणूक केली जाते. पण जेव्हा प्रकल्प वेळेत पूर्ण होत नाहीत, तेव्हा खर्च वाढतो, कर्जावरील व्याज वाढते, पुन्हा अतिरिक्त निधी मंजूर करावा लागतो आणि अखेरीस त्याचा आर्थिक भार नागरिकांवरच येतो. याचा अर्थ असा नाही की विकास प्रकल्प होऊ नयेत. उलट, भारतासारख्या विकसनशील देशाला आधुनिक रेल्वे, महामार्ग, विमानतळ, सिंचन व्यवस्था आणि औद्योगिक पायाभूत सुविधा अत्यंत आवश्यक आहेत. पण विकासाचा अर्थ केवळ भूमिपूजन, घोषणा आणि मोठे आकडे नसतो. योग्य नियोजन, वेळेत मंजुरी, पर्यावरणीय नियमांचे पालन, पारदर्शक खर्च आणि निश्चित कालमर्यादेत पूर्ण होणारे प्रकल्प हाच खऱ्या अर्थाने विकासाचा पाया आहे. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय पर्यावरणाच्या संरक्षणापुरता मर्यादित नाही. हा निर्णय सरकारला आणि सर्व अंमलबजावणी यंत्रणांना एक स्पष्ट संदेश देतो की नियम मोडून विकास करता येणार नाही. विकास महत्त्वाचा आहे, पण तो कायद्याच्या चौकटीत, पारदर्शकतेने आणि जबाबदारीनेच झाला पाहिजे. कारण शेवटी प्रत्येक प्रकल्पामागे सामान्य नागरिकाचा कराचा पैसा असतो. त्यामुळे प्रश्न फक्त पर्यावरणाचा नाही, तर सार्वजनिक पैशाच्या उत्तरदायित्वाचाही आहे.

आता सर्वात मोठा प्रश्न तुम्हाला विचारायचा आहे. सरकारने आधी सुरू असलेले आणि वर्षानुवर्षे रखडलेले प्रकल्प पूर्ण करणे अधिक महत्त्वाचे आहे का, की नवीन प्रकल्पांची सतत घोषणा करत राहणे?

## महाराष्ट्रातील पहिली 'साहित्यरत्न दौड २०२६' पिंपरी-चिंचवडमध्ये; अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना अभिवादन करणारी अनोखी मॅरेथॉन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या समतावादी, परिवर्तनवादी आणि लोकजागृतीच्या विचारांचा व्यापक प्रसार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातील पहिली 'साहित्यरत्न दौड २०२६' या अनोख्या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम आमदार अमित गोरखे युथ फाऊंडेशनच्या संकल्पनेतून आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'प्रबोधन पर्व २०२६' अंतर्गत २ ऑगस्ट रोजी पार पडणार आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित 'साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे प्रबोधन पर्व २०२६' या साप्ताहिक उपक्रमांतर्गत विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून ही भव्य मॅरेथॉन आयोजित करण्यात आली आहे.



या उपक्रमाचे आयोजन पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, आमदार अमित गोरखे युथ फाऊंडेशन, आरटी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि कलारंग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे.

आयोजकांच्या मते, ही दौड केवळ क्रीडा स्पर्धा नसून युवकांमध्ये आरोग्यदायी जीवनशैली, सामाजिक बांधिलकी, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक समरसतेचा संदेश पोहोचविणारा उपक्रम आहे.

लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक कार्यातून वंचित, शोषित, कष्टकरी आणि बहुजन समाजाला स्वाभिमान, संघर्ष आणि सामाजिक न्यायाची प्रेरणा दिली. त्यांच्या या वैचारिक वारशाला अभिवादन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली 'साहित्यरत्न दौड २०२६' ही सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारी राज्यातील पहिली आगळीवेगळी मॅरेथॉन ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते १९ व्या महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेचा शुभारंभ

### ४०० हून अधिक खेळाडूंचा सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते १९ व्या महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा २०२५-२६ चा उत्साहपूर्ण शुभारंभ करण्यात आला. पुणे जिल्ह्यातील ४०० हून अधिक कॅरमपटूंच्या सहभागामुळे स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा क्रीडा विभाग, कॅरम असोसिएशन ऑफ पुणे आणि नवरात्र मित्र मंडळ (इंद्रायणीनगर) यांच्या संयुक्त विद्यमाने कै. सोपानराव भोईर यांच्या स्मरणार्थ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



ही स्पर्धा २९ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत चिंचवड येथील कै. मनिषा भोईर विरंगुळा केंद्र (प्रेमलोक पार्क, सावरकर उद्यानाशेजारी) येथे आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेत पुरुष, महिला आणि ज्येष्ठ नागरिक अशा विविध गटांतील खेळाडू सहभागी झाले आहेत.

स्पर्धेतील विजेत्यांना एकूण ३ लाख ५६ हजार रुपयांची रोख पारितोषिके तसेच आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात येणार आहे.

उद्घाटनप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा विभागाचे उपायुक्त पंकज पाटील, विविध मान्यवर, क्रीडाप्रेमी आणि स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुरुपौर्णिमेनिमित्त बाबासाहेब त्रिभुवन यांचे स्व. लक्ष्मण जगताप यांना अभिवादन; जनसेवेचा संकल्प व्यक्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड** : प्रतिनिधी ।

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीचे सदस्य बाबासाहेब ज्ञानोबा त्रिभुवन यांनी आपले राजकीय गुरू, स्वर्गीय लोकनेते लक्ष्मण जगताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच आमदार शंकर जगताप यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी स्वीकृत नगरसेवक गोपाळ माळेकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना बाबासाहेब त्रिभुवन यांनी आपल्या संघर्षमय प्रवासाच्या आठवणींना उजाळा दिला. बीड जिल्ह्यातून उपजीविकेसाठी पिंपरी-चिंचवडमध्ये आलेला टाटा मोटर्समधील एक सामान्य कामगार ते दोन वेळा नगरसेवक होण्यापर्यंतचा प्रवास हा केवळ स्वतःच्या कष्टांमुळे नव्हे, तर स्वर्गीय लक्ष्मणभाऊ जगताप आणि आमदार शंकरभाऊ जगताप यांनी दाखवलेल्या विश्वास, मार्गदर्शन आणि पाठबळामुळेच शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

गुरू म्हणजे सामान्य माणसातील असामान्य क्षमता ओळखून त्याला समाजासाठी घडवणारे व्यक्तिमत्त्व असते. गुरूंनी दिलेल्या संस्कार आणि विचारांच्या बळावर जनसेवेचा प्रवास अधिक प्रामाणिकपणे आणि निष्ठेने सुरू ठेवण्याचा माझा संकल्प आहे, असे बाबासाहेब त्रिभुवन यांनी यावेळी सांगितले.

गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त करत समाजसेवा आणि विकासाची परंपरा पुढे नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## निगडीतील 'अप्पू घर'चा १८.६० कोटींत कायापालट; आधुनिकीकरणाला स्थायी समितीची मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी : प्रतिनिधी**

गेली ३५ वर्षे पिंपरी-चिंचवडकरांच्या बालपणीच्या आठवणींचा अविभाज्य भाग असलेल्या निगडी येथील इंदिरा गांधी उद्यानातील 'अप्पू घर' अम्युझमेंट पार्कच्या आधुनिकीकरणाला महत्त्वाची मंजुरी मिळाली आहे. १८ कोटी ६० लाखांच्या खाजगी गुंतवणुकीतून या उद्यानाचा संपूर्ण कायापालट करण्यात येणार असून, यासंदर्भातील प्रस्ताव स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी योग्य उपसूचनांसह मंजूर केला आहे.

अप्पू घरमधील बहुतांश राईड्स आणि यंत्रसामग्री २० ते ३५ वर्षे जुनी झाल्याने त्यांची कार्यक्षमता कमी झाली होती. त्यामुळे पर्यटकांची संख्या आणि महसूल घटत होता. आधुनिक पर्यटनस्थळांशी स्पर्धा करण्यासाठी आणि नागरिकांना अधिक आकर्षक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पार्कचे संपूर्ण आधुनिकीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.




या प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक मनोरंजन साधने, सुरक्षित राईड्स आणि आधुनिक सुविधा उभारण्यात येणार असून, त्यामुळे अप्पू घर पुन्हा एकदा शहरातील प्रमुख आकर्षण ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

याशिवाय, कोरोना महामारीदरम्यान १६ मार्च २०२० ते जानेवारी २०२२ या कालावधीत अप्पू घर पूर्णपणे बंद असल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीची दखल घेत, करारातील अटी-शर्तींनुसार भाडेदरात वाढ करून चालकाला अतिरिक्त दोन वर्षांची मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे अप्पू घराचे आधुनिकीकरण वेगाने पूर्ण होऊन पिंपरी-चिंचवडकरांना आधुनिक, सुरक्षित आणि दर्जेदार मनोरंजनाचा अनुभव मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# चिंचवड: बँक खात्याचा सायबर गुन्ह्यांसाठी वापर; लाखो रुपयांची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चिंचवड : प्रतिनिधी**

चिंचवड पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा रजि. क्र. ३३७/२०२६ नुसार, फेडरल बँक (बिजलीनगर, चिंचवड) मधील खातेदार सोनु रामधनी वर्मा (रा. निंबाळकर नगर, मोऱ्यागोसावी, ता. हवेली, पुणे) याने स्वतःचे बँक खाते उघडून सहकाऱ्यांशी संगनमत केले. आरोपीने एका ग्रुपचा सभासद म्हणून स्वतःच्या अकाउंटचा वापर सायबर फसवणुकीच्या व्यवहारांसाठी होऊ दिला. याद्वारे भारतातील २ नागरिकांची १,६३,६६७ रुपये एवढ्या रक्कमेची फसवणूक करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

दाखल कलमे: भारतीय न्याय संहिता (इछड) ६१(२), ३१८(४), ३१७(२), ३(५).

तपास अधिकारी: पोउपनि पवार (९७६६९६२४४६).

**उत्तर महाळुंगे चखृउ: कामगारांच्या वादातून हाणामारी; आरोपी आणि पीडित दोघांचाही उपचारादरम्यान मृत्यू**

उत्तर महाळुंगे एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ६३०/२०२६ नुसार हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ जुलै २०२६ रोजी शिंदे गावच्या हद्दीतील 'युनिटी बिल्ड टेक प्रायव्हेट लिमिटेड'च्या लेबर कॅम्पमध्ये ही घटना घडली.

चिरंजीत वासुमातो (वय ३६, रा. पश्चिम बंगाल) आणि अमरूप उरानो (वय ४३, रा. पश्चिम बंगाल) यांच्यात कौटुंबिक कारणांवरून वाद झाला. या वादातून अमरूप उरानो याने लाकडी पाटाने चिरंजीत यांच्या डोक्यात मारहाण करून त्यांचा जीव घेतला. या मारहाणीत आरोपी अमरूप हा देखील गंभीर जखमी झाला होता. उपचारादरम्यान आरोपी अमरूप उरानो याचाही मृत्यू झाला आहे.

दाखल कलमे: इछड १०३(१).

तपास अधिकारी: पोउपनि ढोले (८८९८११४७९०).

**निगडी: बँक ऑफ महाराष्ट्रच्या खात्यातून आर्थिक गैरव्यवहार**

निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ५०८/२०२६ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. २६ डिसेंबर २०२५ ते ६ मे २०२६ दरम्यान बँक ऑफ महाराष्ट्र (आकुर्डी) येथील खात्याद्वारे गैरव्यवहार करण्यात आला आहे. सौरभ मधुकर जावरे (रा. बिजलीनगर, चिंचवड) याच्यासह इतर आरोपींवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल कलमे: इछड ११२(२), ६१(२), ३१८(४), ३(५).

तपास अधिकारी: स्नेहा रामचंद्र म्हस्के (मपोशि/३८०७).

**पिंपरी: रमाबाई नगरमध्ये मटका अड्ड्यावर धाड; ७ जणांवर कारवाई, लाखांचा मुद्देमाल जप्त**

पिंपरी पोलीस ठाण्यांतर्गत रमाबाई नगर, पिंपरी येथील पत्राच्या शेडमध्ये बेकायदेशीरपणे मटका जुगार चालवणाऱ्या अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकला. गुन्हा रजि. क्र. ४७३/२०२६ अन्वये कारवाई करत पोलिसांनी ७ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

कारवाई करण्यात आलेले आरोपी:

१. विलास सेटप्पा कांबळे (वय ४१)

२. मनोहर मोसे गव्हाई (वय ३८)

३. अनिल मल्लाप्पा वासमानी (वय ३२)

४. भीमा महादेव कांबळे (वय ३२)

५. विलास हुसनाप्पा चलवादी (वय ३८)

६. विजय परमेश्वर पांडागळे (वय ३३)

७. बसवराज लक्ष्मण सोनकांबळे (वय ६१, रा. पिंपरी).

जप्त मुद्देमाल:

घटनास्थळावरून ४३,४७० रुपये रोख आणि १३,००० रुपये किमतीचे ५ मोबाईल असा एकूण ५६,४७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सर्व आरोपींना इछ्छड कलम ३५(३)(६) नुसार नोटीस बजावण्यात आली आहे.

दाखल कलमे: महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १२(अ).

तपास अधिकारी: पोहवा/१५९१ भारती (९५५२५८०७४६).

**चिंचवड: राहुल ससाणेच्या बँक खात्यातून लाखो रुपयांचा सायबर फ्रॉड**

चिंचवड पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा रजि. क्र. ३३८/२०२६ नुसार, राहुल दिलीप ससाणे (रा. खराडी रोड, पुणे) याने फेडरल बँकेतील (बिजलीनगर) आपल्या खात्याचा वापर सायबर गुन्हेगारांना फसवणुकीचे पैसे वळवण्यासाठी करून दिला. या खात्याद्वारे २ नागरिकांची ८५,००० रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आल्याचे समोर आले आहे.

दाखल कलमे: इछड ६१(२), ३१८(४), ३१७(२), ३(५).

तपास अधिकारी: पोउपनि पवार (९७६६९६२४४६).

**तळेगाव एमआयडीसी : भरधाव बसने स्कूटीला उडवले; २ जण गंभीर जखमी**

तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. २१६/२०२६ नुसार रस्ता अपघाताचा गुन्हा नोंदवला गेला आहे. २७ जुलै २०२६ रोजी सकाळी वराळे ते नवलाख उंब्रे रोडवर 'एल अँड टी' कंपनीसमोर हा अपघात घडला.

फिर्यादी अजित माणिकराव इटाळे (वय ३०) आणि त्यांचे मित्र अनिकेत चंदने हे स्कूटीवरून जात असताना, बस क्र. चक१२०छ०५०३ च्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वेगात गाडी चालवून त्यांच्या स्कूटीला जोराची धडक दिली. या भीषण अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दाखल कलमे: इछड २८१, १२५(अ), १२५(ब) व मोटार वाहन कायदा १८४, १३४/१७७.

तपास अधिकारी: सपोनि चौधरी (मो. ७४९८३०६८२८).

**रावेत: स्काय एलिगन्सच्या साईटवरून ७५ हजारांच्या एल्युमिनियम प्लेट्सची चोरी; २ आरोपींना अटक**

रावेत पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. २६६/२०२६ अन्वये चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ ते २८ जुलै २०२६ दरम्यान लक्ष्मीनगर (रावेत) येथील 'स्काय एलिगन्स' या बांधकाम साईटवरून ७५,००० रुपये किमतीच्या एल्युमिनियम प्लेट्स अज्ञात चोरांनी चोरून नेल्या होत्या.

रावेत पोलिसांनी तातडीने तपास चक्र फिरवून दोन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत:

१. प्रेम राकेश वाल्मीकी (वय २१, रा. शेड झोपडपट्टी, चिंचवड)

२. स्वप्निल शंकर कुडवे (वय २४, रा. शेड झोपडपट्टी, चिंचवड)

दाखल कलमे: इछड ३०३(२).

तपास अधिकारी: पोहवा/१०७१ (मो. ९९२३७९८४८१).

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पोंदेवाडीत घरफोडी; ७६ हजारांचे सोन्याचे दागिने लंपास

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील पोंदेवाडी (खारावस्ती) येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून ७६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पारगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुलाबाई पंढरीनाथ सुक्रे (वय ६२, रा. पोंदेवाडी, खारावस्ती, ता. आंबेगाव) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. ही घटना दि. ९ जून २०२६ रोजी रात्री १० ते १० जून रोजी पहाटे १ वाजण्याच्या दरम्यान घडली.

अज्ञात चार चोरट्यांनी घराचा उघडा दरवाजा पाहून आत प्रवेश केला. त्यानंतर कपाटातील सोन्याचे दागिने चोरून नेले. चोरीस गेलेल्या ऐवजात ३ ग्रॅम वजनाची सोन्याची कर्णफुले, एक तोळा वजनाच्या काळ्या मण्यांच्या दोन पोती, अर्धा तोळा वजनाची पानपोत आणि एक तोळा वजनाची सोन्याची चैन असा एकूण ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी पारगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस हवालदार कीर्वे हे या गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### मामुर्डीतील स्मशानभूमीचा प्रश्न तातडीने सोडवा; नागरिकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

मामुर्डी येथील सीजी ४/१६१ आरक्षणाच्या जागेवरील स्मशानभूमीचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी नगरसेविका रेश्मा बापूजी कातळे यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडे केली आहे. स्मशानभूमीचा कायमस्वरूपी प्रश्न निकाली निघेपर्यंत नागरिकांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही त्यांनी आग्रही भूमिका मांडली आहे.

सध्या संबंधित आरक्षित जागेवर नवीन पुलाचे बांधकाम सुरू असल्यामुळे परिसरातील नागरिकांना अंत्यविधीसाठी योग्य जागा उपलब्ध होत नसून मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे दुःखद प्रसंगी नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

# ग्रामीण भागात गॅस सिलिंडर वितरणात विलंब; एचपी ग्राहकांना ४५ दिवस प्रतीक्षा, समान सेवेची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यातील ग्रामीण भागात घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या वितरणातील विलंबामुळे हजारो ग्राहकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. इंडियन ऑईल कंपनीच्या ग्राहकांना सुमारे ३० दिवसांत सिलिंडर मिळत असताना, हिंदुस्तान पेट्रोलियम (एचपी) कंपनीच्या ग्राहकांना तब्बल ४५ दिवसांपर्यंत प्रतीक्षा करावी लागत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. त्यामुळे सर्व गॅस ग्राहकांना समान आणि वेळेवर सेवा मिळावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, वेळेवर बुकिंग करूनही एचपी कंपनीचा सिलिंडर दीड महिन्यानंतर मिळत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. त्याच परिसरात इंडियन ऑईलचे ग्राहक कमी कालावधीत गॅस मिळवत असताना एचपी ग्राहकांना अधिक प्रतीक्षा करावी लागत असल्याने विविध कंपन्यांच्या ग्राहकांमध्ये असमान वागणूक मिळत असल्याची भावना व्यक्त होत आहे.




सध्या पावसाळ्यामुळे सरपण ओले असल्याने ग्रामीण भागातील बहुतांश कुटुंबे स्वयंपाकासाठी एलपीजीवरच अवलंबून आहेत. मात्र, वेळेवर सिलिंडर उपलब्ध होत नसल्याने विशेषतः महिलांची मोठी गैरसोय होत आहे. अनेक कुटुंबांना शेजाऱ्यांकडून सिलिंडर उधार घ्यावा लागत असून, काहींना लाकूड किंवा इतर पर्यायी इंधनाचा वापर करावा लागत असल्याने अतिरिक्त आर्थिक भार आणि त्रास सहन करावा लागत आहे.

ग्रामीण भागात एकत्र कुटुंब पद्धतीमुळे गॅसचा वापर तुलनेने अधिक असल्याने सिलिंडर लवकर संपतो. अशा परिस्थितीत वेळेवर नवीन सिलिंडर मिळणे अत्यावश्यक असतानाही वितरणातील विलंबामुळे नागरिकांच्या अडचणी अधिक वाढत आहेत.

मंचरसारख्या शहरात इंडियन ऑईलचे ग्राहक ३० दिवसांच्या आत सिलिंडर मिळवत असताना, त्याच परिसरातील एचपी ग्राहकांना ४५ दिवसांपर्यंत प्रतीक्षा करावी लागत असल्याने ही तफावत दूर करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. वितरण व्यवस्थेत सुधारणा करून पुरेसा गॅस साठा उपलब्ध ठेवावा, अतिरिक्त मनुष्यबळ व वितरण वाहने उपलब्ध करावीत आणि सर्व ग्राहकांना ३० दिवसांच्या आत सिलिंडर मिळेल, अशी प्रभावी व्यवस्था उभारावी, अशी मागणी संबंधित प्रशासन आणि गॅस वितरण कंपन्यांकडे करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील ग्राहकांनाही शहरांप्रमाणेच समान, दर्जेदार आणि वेळेवर सेवा मिळणे हा त्यांचा अधिकार असून, गॅस वितरणातील विलंब दूर करण्यासाठी संबंधित कंपन्यांनी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये प्रथमच 'साहित्यरत्न दौड'; अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त सात दिवस विविध उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड शहरात यंदापासून 'साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्व २०२६' अंतर्गत सात दिवस विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रथमच 'साहित्यरत्न दौड २०२६' आयोजित करण्यात येणार असून, त्यासोबत माजी नगरसदस्य दिवंगत सोपानराव भोईर यांच्या स्मरणार्थ १९ वी महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धाही होणार आहे.

या उपक्रमांची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत महापौर रवि लांडगे बोलत होते. यावेळी आमदार अमित गोरखे, उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे, नगरसदस्य अनिल घोलप, अनुराधा गोरखे, मधुरा शिंदे, माजी नगरसदस्य मारुती भापकर, उपआयुक्त पंकज पाटील, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गणेश अवघडे तसेच अन्य पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते. महापौर रवि लांडगे म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार समाजाला प्रेरणा देणारे आणि परिवर्तनाची दिशा दाखविणारे आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त प्रथमच आयोजित करण्यात येणारी 'साहित्यरत्न दौड' ही त्यांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणारी आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारी ठरेल. तसेच महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेमुळे राज्य व जिल्ह्यातील खेळाडूंना आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळेल. रविवार, २ ऑगस्ट रोजी होणाऱ्या 'साहित्यरत्न दौड'सह संपूर्ण 'विचार प्रबोधन पर्व' आणि महापौर चषक कॅरम स्पर्धेत नागरिकांनी व खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले.

## एकेकाळच्या 'बटाटा आगार' शिरदाळेत बटाटा लागवडीत मोठी घट; वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकऱ्यांचा पर्यायांकडे कल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या शेवटच्या टोकावर, सातगाव पठार परिसरातील शिरदाळे गावाची ओळख एकेकाळी 'बटाटा आगार' अशी होती. डोंगराळ आणि दुष्काळी परिस्थितीतही पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहून येथील शेतकरी मोठ्या प्रमाणावर बटाटा लागवड करत होते. मात्र गेल्या काही वर्षांत वाढत्या उत्पादन खर्चामुळे ही ओळख आता हळूहळू पुसली जात असून, यंदा बटाटा लागवड अवघ्या दहा टक्क्यांवर आल्याचे चित्र आहे.



> बटाटा हेच आमच्या गावाचे वैशिष्ट्य होते. मात्र वाढत्या खर्चामुळे हे पीक आता परवडत नाही. उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी इतर पिकांकडे वळत आहेत. यंदा पाऊस उशिरा सुरु झाला असला तरी सध्या समाधानकारक पाऊस झाला असून काही ठिकाणी पेरणी अद्याप बाकी आहे.
> **- मयूर सरडे, शेतकरी, शिरदाळे**

शेकडो हेक्टर क्षेत्रावर होणारी बटाटा लागवड यंदा मोठ्या प्रमाणात घटली आहे. बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या वाढलेल्या किमती, मजुरांची टंचाई, मोठ्या भांडवलाची गरज तसेच पावसाची अनियमितता यामुळे बटाटा शेती परवडेनाशी झाल्याचे शिरदाळे येथील बटाटा उत्पादक शेतकरी बाबाजी चौधरी, संदीप मिंडे, राघू रणपिसे, कांताराम तांबे आणि अन्य शेतकऱ्यांनी सांगितले.

बटाट्याला पर्याय म्हणून यंदा परिसरातील सुमारे ६० ते ७० टक्के क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर वाटाणा, उडीद आणि मूग या पिकांचीदेखील लागवड झाली आहे. जनावरांच्या चाऱ्यासाठी मुरघास तयार करण्याच्या उद्देशाने काही शेतकऱ्यांनी मक्याचीही पेरणी केली आहे.

जुलै महिन्यात झालेल्या सातत्यपूर्ण पावसामुळे सर्व पिकांची वाढ चांगली झाली असून, उशिराने झालेल्या खरिपाच्या पेरणीनंतर आता बहुतांश पिके खुरपणीच्या टप्प्यावर आली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असले तरी बटाटा शेतीकडे पुन्हा वळण्यासाठी उत्पादन खर्च कमी होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## सासवडमध्ये अवैध गॅस रिफिलिंगवर मोठी कारवाई; १५० सिलिंडर जप्त, एक ताब्यात, तीन फरार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सासवड । प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील सासवड-हिवरे रस्त्यावरील कोडीत फाटा परिसरात सुरू असलेल्या अवैध गॅस रिफिलिंगच्या अड्ड्यावर नागरी पुरवठा विभाग आणि सासवड पोलिसांनी संयुक्त कारवाई करत सुमारे १५० गॅस सिलिंडर आणि मोठ्या प्रमाणात रिफिलिंग साहित्य जप्त केले. या कारवाईत एक आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, अन्य तीन जण फरार असल्याची माहिती समोर आली आहे.

ही कारवाई पुरंदरचे तहसीलदार विक्रम रजपूत आणि सासवड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सासवड-हिवरे रस्त्यावरील सुप्रभा कंपनीसमोरील कोडीत फाटा परिसरातील पत्र्याच्या दोन खोल्यांमध्ये अवैध गॅस रिफिलिंग सुरू असल्याची माहिती प्रशासनाला मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला.

कारवाईदरम्यान भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीचे घरगुती व व्यावसायिक वापरातील मोठ्या प्रमाणात सिलिंडर आढळून आले. यामध्ये सुमारे ७० भरलेले सिलिंडर, संशयास्पद सील असलेले सिलिंडर, ६० ते ७० रिकामे व्यावसायिक सिलिंडर, तसेच सुमारे १५ घरगुती सिलिंडर आणि गॅस रिफिलिंगसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले.

प्राथमिक तपासात एका सिलिंडरमधील गॅस दुसऱ्या सिलिंडरमध्ये अवैधरित्या भरून कमी दरात विक्री केली जात असल्याचे उघड झाले आहे. अशा प्रकारचे बेकायदेशीर गॅस रिफिलिंग अत्यंत धोकादायक असून त्यामुळे स्फोट किंवा आग लागण्यासारख्या मोठ्या दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे संबंधित विभागांनी या प्रकाराविरोधात कठोर कारवाई सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे.

या प्रकरणी ताब्यात घेतलेल्या आरोपीची चौकशी सुरू असून फरार तिघांचा शोध पोलीस घेत आहेत. जप्त करण्यात आलेल्या सिलिंडर, साहित्य आणि इतर पुराव्यांच्या आधारे पुढील तपास सुरू आहे.

## नेहरू विद्यालयात गुरु पौर्णिमा उत्साहात साजरी; वैभव महाराज शिंदे यांचे विद्यार्थ्यांना संस्कारमूल्यांचे मार्गदर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी : प्रतिनिधी**

निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात गुरु पौर्णिमेचा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्त आयोजित कार्यक्रमात समाजप्रबोधनकार ह.भ.प. वैभव महाराज शिंदे यांनी विद्यार्थ्यांना गुरु पौर्णिमेचे महत्त्व आणि संस्कारमूल्यांबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना वैभव महाराज शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात आई-वडिलांची मनोभावे सेवा केली पाहिजे. आई-वडील हेच आपल्या आयुष्यातील खरे काशी आणि पंढरी आहेत. तसेच गुरु आणि पालक यांच्या ऋणात आयुष्यभर राहून त्यांच्याप्रती कर्तव्यभावनेने वागणे हीच खरी गुरु पौर्णिमेची शिकवण आहे.

कार्यक्रमाला विद्यालयाचे प्राचार्य कांताराम टाव्हरे, पर्यवेक्षक संतोष वळसे, प्रा. अरुण गोरडे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या वर्गशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली केले. कार्यक्रमाच्या शेवटी वैशाली काळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## दौंड-गोपाळवाडी मुख्य रस्त्याच्या निकृष्ट कामावर संताप; जलवाहिनी फुटल्याने परिसरात पूरसदृश स्थिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषद बांधकाम विभागांतर्गत सुरू असलेल्या दौंड-गोपाळवाडी मुख्य रस्त्याच्या कामाच्या निकृष्ट दर्जावर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दौंड पंचायत समितीचे माजी उपसभापती विकास कदम यांनी या प्रकरणी जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांकडे लेखी तक्रार दाखल करून कामाची चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

कदम यांनी तक्रारीत म्हटले आहे की, गेल्या पाच वर्षांपासून रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने आणि टप्प्याटप्प्याने सुरू आहे. सरपंच वस्ती ते साखरे गॅरेज परिसरात नव्याने तयार करण्यात आलेला रस्ता अवघ्या एका महिन्यातच उखडू लागला असून रस्त्यावरील खडी वर आली आहे. त्यामुळे परिसरात सिमेंट-काँक्रीटच्या धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याची तक्रार त्यांनी केली आहे.

**पावसाळ्यात वाहतुकीचा खोळंबा**

सध्या पावसाळा सुरू असतानाही मुख्य चौकातील रस्ता मोठा खड्डा करून उकरून ठेवण्यात आल्याने वाहतुकीची मोठी समस्या निर्माण झाली आहे. प्रशासनाने पर्यायी मार्ग उपलब्ध करून दिला असला तरी अल्प पावसातही या रस्त्यावर चिखल साचत असून वाहनचालकांना घसरून अपघातांचा सामना करावा लागत आहे.



**जलवाहिनी फुटल्याने पाण्याची मोठी नासाडी**

रस्त्याच्या खोदकामादरम्यान निष्काळजीपणामुळे दौंड नगरपरिषदेची मुख्य जलवाहिनी बुधवारी सकाळी फुटली. नियमित पाणीपुरवठ्याच्या वेळी ही घटना घडल्याने सरपंच वस्ती, पुष्पलक्ष्मी हॉस्पिटल, रचना अपार्टमेंट आणि समता नगर परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले. काही काळ संपूर्ण परिसराला ओढ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. या घटनेत हजारो लिटर पाण्याची नासाडी झाली असून नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले.

**चौकशी व कारवाईची मागणी**

रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम, संथ गती आणि खोदकामातील निष्काळजीपणामुळे नागरिकांचे हाल होत असल्याने संपूर्ण कामाची तांत्रिक चौकशी करून दोषी ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच रस्त्याचे काम दर्जेदार पद्धतीने आणि तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी माजी उपसभापती विकास कदम यांनी केली आहे.

## पशुपालकांसाठी जिल्हा परिषदेची आधुनिक साहित्य पुरवठा योजना; ७५ टक्के अनुदान, ४४४ जणांना लाभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील दुग्ध व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेकडून पशुपालकांसाठी आधुनिक साहित्य पुरवठा योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत आधुनिक साहित्य खरेदीसाठी ७५ टक्के अनुदान देण्यात येणार असून, आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या योजनेचा थेट लाभ जिल्ह्यातील ४४४ पशुपालकांना मिळणार आहे. आधुनिक उपकरणांचा वापर वाढवून दुग्ध व्यवसाय अधिक सक्षम, उत्पादक आणि नफ्याचा करण्याचा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

पुणे जिल्ह्यात सध्या ११ लाख ४४ हजार ८९३ गाई व म्हशींचे पशुधन असून, ग्रामीण भागात शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. आधुनिक साधनसामग्रीच्या वापरामुळे पशुपालनातील श्रम कमी होण्यास, उत्पादन क्षमता वाढण्यास आणि दूध व्यवसाय अधिक कार्यक्षम होण्यास मदत होणार असल्याचे जिल्हा परिषदेने स्पष्ट केले आहे.

या योजनेमुळे पशुपालकांचा आर्थिक भार कमी होण्याबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार होऊन जिल्ह्यातील दुग्ध व्यवसायाला नवी चालना मिळेल, असा विश्वास जिल्हा परिषद प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## सारांश वृत्त

### मुंढवा शासकीय जमिनीचा दस्त न्यायालयाने केला रद्द; जिल्हा प्रशासनाकडून दावा मागे घेण्यास नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

मुंढवा येथील शासकीय जमिनीच्या गैरव्यवहारात नोंदविण्यात आलेला दस्त जिल्हा न्यायालयाने रद्द केल्यानंतर जिल्हा प्रशासनानेही न्यायालयात स्वतंत्रीत्या दाखल केलेला दावा मागे घेण्यास नकार दिला आहे. या निकालात जमिनीच्या शासकीय मालकीबाबत संभ्रमावस्था राहिल्याने जिल्हा प्रशासनाने आपला दावा कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. ही जमीन सरकारचीच असून आता ती बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडियाच्या नावावर करण्याचा प्रस्तावही राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. त्यामुळेच दावा मागे घेण्याचा प्रश्न नाही, असे स्पष्टीकरण जिल्हा प्रशासनाने दिले आहे. याबाबत शुक्रवारी (दि. ३०) सुनावणी होणार आहे. मुंढवा येथील ४० एकर शासकीय जमीन कुलमुख्त्यारधारक शीतल तेजवानी यांनी खासदार पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीचे भागधारक दिग्विजय पाटील यांना ३०० कोटी रुपयांत विकली. मात्र, या व्यवहारात एकही रुपया मिळाला नाही. तसेच जमीनही नावावर झाली नाही, असा दावा तेजवानी यांनी जिल्हा न्यायालयात दाखल केला होता. त्यावर न्यायालयाने हा दावा मान्य करत या व्यवहारातील दस्तच रद्द केला. तसेच या व्यवहारात देण्यात आलेले मुद्रांक शुल्क परत मागण्याचा अधिकार पक्षकारांना देण्यात आला. या प्रकरणात व्यवहारच पूर्ण न झाल्याने जमिनीबाबत संबंधित कुळांकडे ताबा राहील, असा आदेशही न्यायालयाने दिला. तत्पूर्वी ही जमीन राज्य सरकारची असल्याने व्यवहार बेकायदा असल्याचे सांगत हा दस्त रद्द करावा, असा दावा जिल्हा प्रशासनाने जिल्हा न्यायालयात केला होता. त्याबाबत सुनावणी सुरू आहे. मात्र, तेजवानी विरुद्ध अमेडिया प्रकरणात याच व्यवहारातील दस्त रद्द झाल्यानंतर जिल्हा प्रशासनानेही हा दावा मागे घ्यावा, अशी विनंती दोन्ही पक्षकारांकडून करण्यात आली. मात्र, जमिनीच्या मालकीहक्काबाबत निकाल जिल्हा प्रशासनाच्या दाव्याच्या विरोधात असल्याने दावा मागे घेण्यास जिल्हा प्रशासनाने स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे.

# ‘खटल्याची प्रक्रियाच शिक्षा ठरू नये’ माजी कायदामंत्र्यांचा न्यायव्यवस्थेवर सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या दिलास्यानंतर देशाच्या फौजदारी न्यायव्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. माजी केंद्रीय कायदामंत्री आणि ज्येष्ठ विधिज्ञ अश्विनी कुमार यांनी गुरुवारी (३० जुलै) म्हटले की, सर्वोच्च न्यायालयाने डॉ. मनमोहन सिंग यांना दिलेले निर्दोषत्व हे केवळ एका व्यक्तीचा विजय नसून, भारतातील फौजदारी न्यायव्यवस्थेत व्यापक सुधारणांची गरज अधोरेखित करणारा निर्णय आहे.

अश्विनी कुमार यांनी या निर्णयाला सत्याचा विजय असे संबोधत, डॉ. मनमोहन सिंग यांच्याविरुद्धचा फौजदारी खटला कायद्याच्या दृष्टीने टिकू न शकणारा असल्याचे म्हटले. त्यांनी स्पष्ट केले की, अनेकदा न्यायालयीन प्रक्रिया इतकी प्रदीर्घ आणि त्रासदायक ठरते की, अंतिम निकाल निर्दोषत्वाचा लागला तरी त्या व्यक्तीने वर्षानुवर्षे शिक्षा भोगल्यासारखी परिस्थिती निर्माण होते.



त्यांच्या मते, या प्रकरणाने भारतीय फौजदारी न्यायव्यवस्थेतील एक मूलभूत त्रुटी पुन्हा समोर आणली आहे खटल्याची प्रक्रियाच शिक्षा बनू नये. आरोप सिद्ध होण्यापूर्वीच दीर्घकाळ चालणारे खटले, सार्वजनिक प्रतिमेचे नुकसान आणि माध्यमांमधील चर्चांमुळे एखाद्या व्यक्तीला मोठी किंमत मोजावी लागते, असे त्यांनी नमूद केले.

अश्विनी कुमार यांनी माध्यमांतील खटले (मीडिया ट्रायल) यावरही टीका केली. त्यांच्या मते, न्यायालयाचा अंतिम निर्णय येण्यापूर्वीच सार्वजनिक स्तरावर दोषी ठरवण्याची प्रवृत्ती न्यायव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांवर परिणाम करू शकते. त्यामुळे तपास, अभियोजन आणि न्यायालयीन प्रक्रिया अधिक उत्तरदायी, जलद आणि निष्पक्ष करण्यासाठी व्यापक सुधारणांची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर फौजदारी खटल्यांतील विलंब, तपास यंत्रणांची जबाबदारी, माध्यमांची भूमिका आणि आरोपींच्या घटनात्मक अधिकारांबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. कायदेतज्ज्ञांच्या मते, हा निर्णय केवळ एका खटल्यापुरता मर्यादित नसून, भारतीय न्यायव्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो.

## ग्लासगोत भारताचा जलवा! दिलीप गावितचे विक्रमी सुवर्ण, मुरली श्रीशंकरचे सलग दुसरे रौप्य;

■ दैनिक राज्य लोकतंत्र

ग्लासगो । वृत्तसंस्था

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारतीय खेळाडूंनी गुरुवारी (३० जुलै) आणखी एक संस्मरणीय दिवस गाजवला. पॅरा ॲथलेटिक्समध्ये दिलीप महादू गावित यांनी विक्रमी कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले, तर लांब उडीत भारताच्या मुरली श्रीशंकर यांनी सलग दुसऱ्या राष्ट्रकुल स्पर्धेत रौप्यपदक जिंकत सातत्यपूर्ण उत्कृष्टतेचा ठसा उमटवला.

पुरुषांच्या लांब उडीच्या अंतिम फेरीत श्रीशंकर यांनी ८.०९ मीटरची सर्वोत्तम उडी मारत रौप्यपदक जिंकले. जमैकाचा माजी विश्वविजेता ताजे गेले याने ८.१५ मीटर उडीसह सुवर्णपदक पटकावले, तर स्कॉटलंडच्या स्टीफन मॅकेन्झीने ८.०८ मीटर उडीसह कांस्यपदक मिळवले. विशेष म्हणजे, बर्मिंगहॅम २०२२ नंतर श्रीशंकरचे हे सलग दुसरे राष्ट्रकुल रौप्य आहे. दुसरीकडे, पॅरा ॲथलेटिक्समध्ये दिलीप महादू गावित यांनी सुवर्णपदकासह नवीन राष्ट्रकुल स्पर्धा विक्रम नोंदवत भारताच्या पदकतालिकेत सुवर्णाची भर घातली. त्यांच्या कामगिरीमुळे भारताचा आत्मविश्वास आणखी उंचावला असून ॲथलेटिक्समधील भारताची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

या कामगिरीनंतर राष्ट्रकुल स्पर्धेत भारताची पदकसंख्या १५ वर पोहोचली असून भारतीय खेळाडू विविध स्पर्धांमध्ये आणखी पदकांची आशा निर्माण करत आहेत. बॉक्सिंगमध्येही अनेक भारतीय खेळाडूंनी उपांत्य फेरी गाठत किमान पदके निश्चित केली आहेत.

## ‘प्रेम गुन्हा नाही, तपास गुन्हेगारांचा करा!’ अलाहाबाद उच्च न्यायालयाचे उत्तर प्रदेश पोलिसांना खडे बोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

सज्ञान व्यक्तींना आपल्या पसंतीच्या व्यक्तीसोबत विवाह करण्याचा घटनात्मक अधिकार असल्याचे पुन्हा अधोरेखित करत अलाहाबाद उच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश पोलिसांना कडक शब्दांत फटकारले आहे. सज्ञान व्यक्तींच्या विवाहात पोलिसांनी नाक खुपसू नये; तुमचे काम गुन्ह्यांचा तपास करणे आहे, विवाहाचा नाही, असे स्पष्ट निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

न्यायमूर्ती जे. जे. मुनीर आणि तरुण सक्सेना यांच्या खंडपीठाने फेब्रुवारी २०२६ मध्ये विवाह केलेल्या एका सज्ञान जोडप्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ८७ अंतर्गत दाखल करण्यात आलेला एफआयआर रद्द केला. सुनावणीदरम्यान न्यायालयाच्या निदर्शनास आले की, विवाहाला विरोध करणाऱ्या महिलेच्या वडिलांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी विवाहाचीच चौकशी सुरू ठेवली होती.

यावर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले की, सज्ञान व्यक्तींनी स्वेच्छेने विवाह केला असेल, तर त्यांच्या वैवाहिक निर्णयात पोलिसांनी हस्तक्षेप करण्याचा कोणताही अधिकार नाही. न्यायालयाने जोडप्याचा आरोप प्रथमदर्शनी ग्राह्य धरत पोलिस यंत्रणा महिलेच्या वडिलांच्या भूमिकेला पाठिंबा देत असल्याचे दिसत असल्याची नोंद केली. याप्रकरणी न्यायालयाने पोलिस प्रशासन आणि तक्रारदार वडील या दोघांवरही दंड ठोठावला. न्यायालयाने स्पष्ट केले की, भारतीय राज्यघटनेने प्रत्येक सज्ञान नागरिकाला स्वतःचा जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. समाज, कुटुंब किंवा इतर कोणत्याही दबावामुळे हा अधिकार हिरावून घेतला जाऊ शकत नाही. पोलिसांची भूमिका कायदा व सुव्यवस्था राखणे आणि प्रत्यक्ष गुन्ह्यांचा तपास करणे इतकीच मर्यादित आहे. या निर्णयामुळे पुन्हा एकदा न्यायालयाने वैयक्तिक स्वातंत्र्य, वैवाहिक निवडीचा अधिकार आणि पोलिसांच्या अधिकारमर्यादा यावर स्पष्ट भूमिका मांडली आहे. कायदेतज्ज्ञांच्या मते, सज्ञान व्यक्तींच्या विवाहात अनावश्यक हस्तक्षेप करणाऱ्या यंत्रणांसाठी हा निर्णय महत्त्वाचा संदेश मानला जात आहे.

# शिक्षण व्यवस्थेची खोलवर झालेली पडझड? ‘प्रधानांचा राजीनामा ही फक्त सुरुवात’ ' काँग्रेसचा केंद्र सरकारवर घणाघात!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

देशातील शिक्षण व्यवस्थेतील कथित अनियमितता, प्रश्नपत्रिका फुटी, प्रवेश प्रक्रियेतील वाद आणि भरतीतील गैरव्यवहार यांमुळे निर्माण झालेल्या वातावरणावरून काँग्रेसने केंद्र सरकारवर तीव्र टीका केली आहे.

काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी महाराष्ट्रातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या प्रवेश प्रक्रियेत कथित व्यवस्थापित परीक्षा केंद्र गैरव्यवहाराचा उल्लेख करत म्हटले की, भारतातील शिक्षण व्यवस्थेतील सड अत्यंत खोलवर आहे. धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा हा शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित करण्याच्या दीर्घ प्रवासातील केवळ पहिला टप्पा आहे.



काँग्रेसचा दावा आहे की, गेल्या काही वर्षांत विविध स्पर्धा परीक्षा, प्रवेश प्रक्रिया आणि भरती प्रक्रियांभोवती निर्माण झालेल्या वादांमुळे लाखो विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. अशा परिस्थितीत केवळ कायदे करून किंवा जलदगती न्यायालयांची घोषणा करून प्रश्न सुटणार नाहीत, तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि मूलभूत सुधारणा आवश्यक आहेत.

महाराष्ट्रातील अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार समोर आल्यानंतर परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. विरोधकांच्या मते, या घटना अपवाद नसून शिक्षण व्यवस्थेतील गंभीर त्रुटींचे निदर्शक आहेत.

दरम्यान, या आरोपांवर केंद्र सरकार किंवा संबंधित यंत्रणांकडून अधिकृत भूमिका अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता, विद्यार्थ्यांचे भविष्य आणि परीक्षांची विश्वासार्हता याविषयीचा सार्वजनिक वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# माळीणच्या जखमा अजूनही ताज्याच..! १२ वर्षांनंतरही पाच अतिधोकादायक गावांचे पुनर्वसन रखडले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

माळीण : प्रतिनिधी

३० जुलै रोजी माळीण येथील भीषण भूस्खलन दुर्घटनेला बारा वर्षे पूर्ण होत असताना, त्या दुर्घटनेतून शासनाने धडा घेतल्याचे दावे वारंवार केले जात असले, तरी आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील अतिधोकादायक घोषित पाच गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आजही प्रलंबितच आहे. तब्बल बारा वर्षे उलटूनही सुरक्षित निवाऱ्याची प्रतीक्षा कायम असल्याने ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

माळीण दुर्घटनेनंतर राज्य शासनाच्या निर्देशानुसार भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांच्या सहकार्याने राज्यातील भूस्खलनप्रवण गावांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. या समितीने १२ फेब्रुवारी २०१५ रोजी पुणे जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या अहवालात जिल्ह्यातील २३ गावांमध्ये भूस्खलनाचा धोका असल्याचे स्पष्ट केले होते. त्यामध्ये आंबेगाव तालुक्यातील काळवाडी क्रमांक १, काळवाडी क्रमांक २ (जांभोरी), बेंढारवाडी (पोखरी), भगतवाडी (फुलवडे), पसारवाडी (माळीण), तसेच असाणे या गावांचा समावेश होता.

दुर्घटनेनंतर या गावांचे संरक्षण करण्यासाठी गावांच्या वरच्या बाजूस संरक्षण भिंती, गटारे आणि इतर प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी शासनाने सुमारे ८९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता. मात्र, ग्रामस्थांनी ग्रामसभेत ठराव करून संरक्षणात्मक उपाययोजनांऐवजी संपूर्ण गावांचे सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करण्याची भूमिका घेतली. त्यानुसार हा निधी पुनर्वसनासाठी जागा खरेदी करण्यासाठी वापरण्यात आला.

काळवाडी क्रमांक १, काळवाडी क्रमांक २, बेंढारवाडी आणि पसारवाडी या गावांसाठी पुनर्वसनाच्या जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. मात्र, आवश्यक निधीचा अभाव आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे प्रत्यक्ष पुनर्वसनाची प्रक्रिया अद्यापही पूर्णत्वास गेलेली नाही. काळवाडी क्रमांक १ मध्ये ग्रामस्थांसाठी गावालगत ३५ भूखंड तयार करण्यात आले आहेत. त्यापैकी केवळ ३० घरकुलांना मंजुरी मिळाली असून, मंजूर आर्थिक मदत अपुरी असल्याने अनेक कुटुंबांसमोर घरबांधणीचे आव्हान उभे आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी किंवा सीएसआर निधीतून अतिरिक्त आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. काळवाडी क्रमांक २ येथील ३७ घरांच्या पुनर्वसनासाठी जांभोरीजवळ निंबोणीचीवाडी येथे जागा खरेदी करण्यात आली आहे. मात्र, जागेचे सपाटीकरण, अंतर्गत रस्ते, पाणी, वीज यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी आवश्यक निधी उपलब्ध नसल्याने पुनर्वसनाचा मार्ग अद्याप मोकळा झालेला नाही.

पोखरी गावातील बेंढारवाडीच्या पुनर्वसनासाठी वाडीच्या वरच्या बाजूस सपाट जागा उपलब्ध असूनही स्थानिक अडचणींमुळे भूखंडांचे नियोजन आणि वाटप रखडले आहे. माळीण गावातील पसारवाडीसाठी पुनर्वसनाची जागा खरेदी करून ३२ घरांचे भूखंडही वाटप करण्यात आले आहे. शासनाने लाभार्थ्यांना घरकुल मंजूर केले असले, तरी जागेच्या सपाटीकरणासाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे प्रत्यक्ष काम सुरू होऊ शकलेले नाही. फुलवडे गावातील भगतवाडीमध्ये १४ कुटुंबे अतिधोकादायक परिस्थितीत वास्तव्यास आहेत. घरकुल मंजूर असूनही पुनर्वसनासाठी योग्य जागाच निश्चित न झाल्याने ही कुटुंबे आजही दर पावसाळ्यात जीव मुठीत घेऊन दिवस काढत आहेत.

दरवर्षी मुसळधार पावसाला सुरुवात झाली की, या सर्व गावांतील नागरिकांच्या मनात भूस्खलनाची भीती पुन्हा डोके वर काढते. माळीणसारखी दुर्घटना पुन्हा घडू नये, यासाठी तातडीने पुनर्वसन पूर्ण करण्याची मागणी ग्रामस्थांकडून सातत्याने होत आहे.

# विद्यार्थ्यांसमोर गोळ्या की संवाद? सर्वोच्च न्यायालयाचा सरकारला टोला; ‘आंदोलनांना हिंसेने नव्हे, संयमाने उत्तर द्या!’

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

२० जुलै २०२६ रोजी नीट-यूजी पेपरफुटीविरोधातील आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिस कारवाईवर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी (३० जुलै) कठोर निरीक्षण नोंदवत राज्याच्या भूमिकेवर महत्त्वपूर्ण भाष्य केले. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि सरकारी धोरणांविरोधातील सार्वजनिक निदर्शने यांना हिंसक दडपशाहीने नव्हे, तर अहिंसक आणि संयमी पद्धतीने उत्तर देणे हे राज्याचे घटनात्मक कर्तव्य आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने पेलेट गोळ्यांमुळे जखमी झालेल्या आंदोलकांच्या याचिकेवर सुनावणी करताना या टिप्पणी केल्या. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ वृंदा ग्रोव्हर यांनी असा युक्तिवाद केला की, गर्दी पांगवण्यासाठी धातूचे कण असलेल्या पेलेट गोळ्यांचा वापर आवश्यकता, प्रमाणबद्धता आणि वाजवीपणा या घटनात्मक निकषांवर टिकत नाही.

मात्र, न्यायालयाने पोलिसांच्याही सुरक्षेचा मुद्दा तेवढ्याच ठामपणे मांडला. पोलिसही माणसेच आहेत. त्यांना स्वतःचा जीव आणि सुरक्षितता जपण्याचा अधिकार आहे, असे न्यायालयाने नमूद करत, आंदोलने हाताळताना पोलिसांकडे योग्य संरक्षणात्मक साधने आणि सुरक्षात्मक उपकरणे असणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

न्यायालयाने हेही मान्य केले की, अनेक वेळा शांततापूर्ण विद्यार्थी आंदोलनात काही समाजकंटक घुसून परिस्थिती



हिंसक बनवू शकतात. त्यामुळे कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सरकारवर असली तरी, प्रत्येक आंदोलनाकडे संशयाने पाहून अतिरेकी बळाचा वापर करणे योग्य ठरणार नाही, असे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.

नीट-यूजी पेपरफुटीनंतर देशभरात विद्यार्थ्यांनी तीव्र आंदोलन छेडले होते. या आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिस कारवाईत अनेक आंदोलक जखमी झाल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानंतर पेलेट गोळ्यांच्या वापरावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणामुळे आता विद्यार्थ्यांची आंदोलने हाताळण्याबाबत सरकार आणि पोलिस यंत्रणांनी अवलंबावयाच्या धोरणावर नव्याने चर्चा सुरू होण्याची शक्यता आहे. न्यायालयाने दिलेला संदेश स्पष्ट आहे कायदा आणि सुव्यवस्था राखणे आवश्यक आहे; पण लोकशाहीत मतभिन्नतेला उत्तर दडपशाहीने नव्हे, तर घटनात्मक संयमाने दिले गेले पाहिजे.